सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

**क्रमांक : 2253/मदुसे-सरापो/राकनि-2/(मुख्य)/2019/18** **दिनांक 29 ऑगस्ट, 2019**

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक 24 ऑगस्ट, 2019** रोजी घेण्यात आलेल्या **"महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा-2019"** या स्पर्धा परीक्षेच्या **राज्य कर निरीक्षक पदाकरीता स्वतंत्र पेपर (पेपर क्र.2)** या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षांमधील आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना आकृत्या/नकाशांवर आधारित असलेल्या प्रश्नांमध्ये खालील विवरणपत्रात नमूद प्रश्नांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| संच A | संच B | संच C | संच D |
|---|---|---|---|
| 81 | 71 | 61 | 41 |
| 85 | 75 | 65 | 45 |
| 91 | 81 | 71 | 51 |

**तसेच प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपुस्तिकांच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी हरकती/अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या** www.mpsc.gov.in **या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती विहित नमुन्यात ' परीक्षा नियंत्रक व सह सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, 5½, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई 400021' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दि. 5 सप्टेंबर,** 2019 पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती/अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : 29 ऑगस्ट, 2019
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई